दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ८४ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 14 Nov 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 84 • Pages 4 • Rate 4 Rs

### खालच्या अधिकाऱ्यांनी खरी बदमाशी केली

**मुंबई–** अंबादास दानवे यांनी पार्थ पवारांचा घोटाळा भाजपनेच बाहेर काढल्याचाही आरोप केला आहे. बावनकुळे यांनी त्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, ना अंबादास दानवे यांना, ना चंद्रशेखर बावनकुळे यांना किंवा किंवा मुख्यमंत्र्यांना हे माहिती होते. खालच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात खरी बदमाशी केली. एक तहसीलदार, मुद्रांक अधिकारी व देणारे - घेणारे दोन लोक, या लोकांनी केलेली ही चूक आहे. खालचे अधिकारी काय करतात हे सरकारला थोडेच माहिती असते. जेव्हा बातमी येते तेव्हा सरकार त्याची दखल घेते.त्यामुळे रोजच्या व्यवहारात खालचा एखादा तलाठी, एखादा तहसीलदार किंवा एखादा मुद्रांक अधिकारी काय करेल हे सांगता येत नाही. त्यांना आदेश देण्याचा अधिकार आहेत. ते त्यांच्या अधिकारांचा कसा गैरवापर करतात हे सरकारला थोडेच माहिती असते. सरकारला जेव्हा माहिती होते तेव्हा कारवाई होते.

# शरद पवार गटाला निवडणूक आयोगानचा मोठा दिलासा; 'तुतारी' सदृश 'पिपाणी' चिन्ह वगळले

## लोकसभा, विधानसभा निवडणुकीत बसला होता फटका

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हाशी साधर्म्य असलेल्या 'पिपाणी' (ट्रम्पेट) चिन्हामुळे मोठा फटका बसल्याचा दावा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला शरद पवार गटाला अखेर निवडणूक आयोगाने दिलासा दिला आहे. आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी आपल्या मुक्त चिन्हांच्या यादीतून 'पिपाणी' हे चिन्ह वगळले आहे. या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवडणूक आयोगाचे आभार मानले आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत 'तुतारी' (राष्ट्रवादी) आणि 'पिपाणी' (अपक्ष) या दोन्ही चिन्हांमध्ये नावाचे व दर्शनाचे साधर्म्य असल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या नामसाधर्म्यामुळे पक्षाला मिळणारी मते अपक्ष उमेदवारांना मिळाली. तसेच विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे ९ उमेदवार याच चिन्हामुळे पडल्याचा दावा पक्षाने केला होता.

लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवार गटाकडून 'पिपाणी' हे चिन्ह निवडणुकीच्या चिन्हांच्या यादीतून त्वरित वगळण्याची मागणी वारंवार करण्यात येत होती. निवडणूक आयोगाने अखेर राष्ट्रवादीची मागणी मान्य करत आपल्या १९४ मुक्त चिन्हांच्या यादीतून 'पिपाणी' (ट्रम्पेट) हे चिन्ह गोठवले आहे. या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाला






मोठा दिलासा मिळाला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदारांचा संभ्रम टळणार आहे.दरम्यान, निवडणूक चिन्हातून पिपाणी (ट्रम्पेट) हे चिन्ह वगळल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाचे आभार मानले आहेत. यासंदर्भात आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या पिपाणीचा खूप मोठा फटका आम्हाला सहन करावा लागला. हाच निर्णय लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत घेतला असता तर आजचे चित्र खूप वेगळे असते. पण असो! देर आए दुरुस्त आए..! असे म्हणत रोहित पवार यांनी निवडणूक आयोगाला चिमटा काढला आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मतांनंतर विधानसभा निवडणुकीत अनेक अपक्ष उमेदवारांनी 'पिपाणी' हे चिन्ह मिळवण्यासाठी मोठी मागणी केली होती. विशेषतः शिरूर, बारामती, सातारा, भिवंडी, दिंडोरी, रावेर, अहमदनगर, बीड या मतदारसंघांत या चिन्हाला मोठी पसंती मिळाली होती. तसेच जिंतूर, घनसावंगी, शहापूर, बेलापूर, अणुशक्तीनगर, आंबेगाव, पारनेर, केज, परांडा या मतदारसंघांत शरद पवार गटाचे उमेदवार जितक्या मतांनी पराभूत झाले, त्यापेक्षा अधिक मते 'पिपाणी' चिन्हावरील अपक्षांना मिळाली होती. जर ही मते विभाजित झाली नसती, तर राष्ट्रवादीचे १९ आमदार निवडून आले असते, असा दावा करण्यात आला होता.

# पूरग्रस्तांसाठी मुथुट मायक्रोफिनचा मदतीचा हात

### नायगावात शंभरहून अधिक अन्नधान्य किटचे वाटप

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । हानुमंत चंदनकर**

नायगाव तालुक्यात झालेल्या ढगफुटी पावसामुळे शेतकरी व गोरगरीब जनतेचे मोठे नुकसान झाले. अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले. या संकटग्रस्त कुटुंबांना दिलासा म्हणून मुथुट मायक्रोफिन लिमिटेड शाखा नायगाव यांच्या वतीने आज (दि. १३ नोव्हेंबर) शहरातील अंबिका मंगल कार्यालयात शंभरहून अधिक पूरग्रस्तांना अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला शाखा व्यवस्थापक सोनल गुलशन, एरिया मॅनेजर राजरत्न कदम, प्रमुख पाहुणे युवा उद्योजक पवन गादेवार, नायगाव पोलीस ठाण्याचे एएसआय पाटील, पोलीस कॉन्स्टेबल शंकर पवार, कलेक्शन मॅनेजर आत्माराम शिंदे, एरिया क्रेडिट मॅनेजर आबाजी सोनार, ब्रांच मॅनेजर संकेत कदम, बीसीएम योगेश देशमुख तसेच पत्रकार बंधू उपस्थित होते.कार्यक्रमात पवन गादेवार यांनी पूरग्रस्तांशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवले. या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी मुथुट मायक्रोफिन टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले.सामाजिक बांधिलकी जपत मुथुट मायक्रोफिनने दिला पूरग्रस्तांना आधार!

# बीड नगराध्यक्ष पदासाठी दिव्या महेश स्वामी यांचा पहिला उमेदवारी अर्ज दाखल

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव झाले आहे. या पदासाठी उच्चशिक्षित एमएससी ॲग्री झालेल्या आणि सध्या स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या तरुण अविवाहित दिव्या महेश स्वामी यांनी नगराध्यक्ष पदासाठी पहिला अर्ज दाखल केला आहे.



बीड नगरपालिकेच्या निवडणूक कक्षामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांच्याकडे बीड नगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन पत्र अनुक्रमांक १ नुसार १३ नोव्हेंबर रोजी दाखल केले आहे. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची उपस्थिती होती. उमेदवारांच्या अर्जाची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होणार आहे.बीड नगराध्यक्ष पदासाठी अतिशय सामान्य कुटुंबातील उच्च शिक्षित तरुण असलेल्या दिव्या महेश स्वामी यांनी समाजाच्या आग्रहास्तव उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विविध राजकीय पक्षांनी उमेदवारीसाठी विचारणा केली. मात्र अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्धार सद्यस्थितीत तरी केला असल्याचे अपक्ष उमेदवार दिव्या स्वामी यांनी स्पष्ट केले आहे. तिच्या उमेदवारीमुळे वीरशैव लिंगायत समाजासह सर्वसामान्य मतदारांमधून उस्फूर्तपणे स्वागत होत आहे. उमेदवार दिव्याचे आजोबा ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक केज मतदार संघाचे पहिले आमदार कै. रामलिंग स्वामी हे होते.तर मोठे बंधू वैभव स्वामी हे पत्रकार असून त्यांनी देखील केज विधानसभा राखीव मतदार संघातून दोन वेळा निवडणूक लढवलेली आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवूनच मी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवणार असल्याचे दिव्या स्वामी यांनी सांगितले आहे.

# कु.आभा गणेश मुंडे हिची राष्ट्रीय पॅरा स्वीमिंग स्पर्धेसाठी निवड

### जिद्दीला सलाम! परळीच्या मुलीने दाखवला प्रेरणादायी संघर्षाचा आदर्श

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथील विद्यावर्धिनी विद्यालयाची विद्यार्थिनी कु. आभा गणेश मुंडे हिची २५ वी राष्ट्रीय पॅरा स्वीमिंग स्पर्धा (National Para Swimming Championship) साठी निवड झाली आहे. ही स्पर्धा दिनांक १५ ते १८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान जी.एम.सी. बालयोगी कॉम्प्लेक्स, हैदराबाद येथे होणार आहे.

कु. आभा गणेश मुंडे ही दोन्ही पायांनी अपंग असूनही तिच्या अतूट इच्छाशक्ती, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. महाराष्ट्र संघाकडून तिची निवड झाली असून ती ५० मीटर फ्री स्टाईल, १०० मीटर बॅकस्ट्रोक आणि १०० मीटर बटरफ्लाय या तीन प्रकारांमध्ये सहभागी होणार आहे.



या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आज विद्यावर्धिनी विद्यालयात कु. आभाचा सत्कार करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी मुख्याध्यापक श्री. राजेश्वर नीला, क्रिडाशिक्षक विजय मुंडे, बालासाहेब हंगरगे, तसेच सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी तिच्या यशाचे कौतुक करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

कु. आभाने आपल्या अडचणींवर मात करत राष्ट्रीय स्तरावर पोहोचून परळी शहराचाच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याचा अभिमान वाढविला आहे. तिच्या या यशामुळे अपंगत्वावर मात करूनही उज्वल यश मिळविता येते, हा प्रेरणादायी संदेश समाजाला मिळाला आहे.

# प्रा.टी.पी.मुंडे यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

### एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश ;कार्यकर्त्यांचा जल्लोष

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील लोकनेते व अनुभवी राजकारणी प्रा. टी.पी. मुंडे सर यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हातात भगवा झेंडा घेत आज परभणी येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेशानंतर कार्यकर्त्यांकडून शहरात ठिकठिकाणी फटाके फोडून, पुष्पवृष्टी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले.



३५ वर्षांच्या समृद्ध राजकीय अनुभवाचा लाभ आता शिवसेनेला मिळणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक बळकट होईल. प्रा. मुंडे यांनी प्रवेशानंतर आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की, शिवसेना हा जनतेच्या मनातील पक्ष आहे. पक्ष म्हणून जी जबाबदारी माझ्यावर सोपवली जाईल ती मी पूर्ण ताकदीने आणि प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. त्यांच्या प्रवेशामुळे परळी परिसरात राजकीय समीकरणे बदलणार आहेत कार्यकर्त्यांमध्ये नवीन उर्जा आणि उत्साह निर्माण झाला आहे. स्थानिक पातळीवर पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य दिसून येत आहे. यावेळी ओमप्रकाश सारडा, आप्पाराव पांढरे, भीमराव मुंडे, आत्माराम कराड,विनायक गडदे, सूर्यकांत मुंडे, रफीक भाई कुरेशी, रवींद्र पापा गीते, दत्तात्रय ढवळे, छत्रपती कावळे,प्रा.विजय मुंडे, प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे, श्रीनिवास कुलकर्णी, बाळासाहेब मुंडे आदींनी पक्षात प्रवेश केला.

# जमीन वादातून वृद्धाची हत्या: आरोपी महिलेला जन्मठेप आणि १५ हजारांचा दंड!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शेतजमिनीच्या पैशांवरून झालेल्या वादानंतर एका ७० वर्षीय वृद्धाची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपी महिलेला जन्मठेप आणि १५ हजार रुपये दंडाची कठोर शिक्षा ठोठावली आहे. २६ एप्रिल २०१९ रोजी अक्कलकुवा पोलीस ठाणे हद्दीतील कुंडी-होराफळी गावाजवळ कंजाला नदीजवळ एका फरशीखाली ७० वर्षीय धिरुभाई छोटुलाल तडवी (रा. बारेजा, जि. अहमदाबाद) यांचा मृतदेह रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आला होता. पोलीस पाटील रजनिकांत वसावे यांच्या फिर्यादीवरून अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक योगेश राऊत यांनी केलेल्या सखोल तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, मयत धिरुभाई तडवी हे कोराई येथील रुमाबाई अरुण पाडवी हिच्याकडे राहत होते. त्यांच्यात शेतजमिनीच्या पैशांवरून वाद होता. याच वादातून रुमाबाईने तिचा




साथीदार विष्णु प्रल्हाद कापुरे याच्या मदतीने धिरुभाई यांना ठार मारले. तपासाअंती आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली आणि शहादा येथील सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहादा, एस. सी. पठारे यांच्यासमोर या खटल्याची सुनावणी झाली. सरकार पक्षाचे वतीने तपासण्यात आलेले साक्षीदार, पंच आणि तपास अधिकारी यांच्या साक्ष महत्त्वाच्या ठरल्या. सबळ पुराव्यांच्या आधारे आरोपी रुमाबाई अरुण पाडवी हिच्याविरुद्ध खून (भा.द.वि. कलम ३०२) आणि पुरावा नष्ट करण्याचा (कलम २०१) गुन्हा सिद्ध झाला. न्यायालयाने रुमाबाई पाडवी हिला जन्मठेपेची शिक्षा आणि १५ हजार रुपये दंड ठोठावला.

या खटल्यात सरकारी पक्षाचे वतीने अति. सरकारी अभियोक्ता ॲड. वाय. बी. मोरे यांनी कामकाज पाहिले. यशस्वी तपास आणि न्यायालयीन कामकाजाबद्दल नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस., अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकुवा सुभाष भोये आणि जिल्हा सरकारी वकील ॲड. विनोद गोसावी यांनी तपास अधिकारी आणि पैरवी पथकाचे अभिनंदन केले आहे.

संपादकीय

# बेकरी क्वीन

वयाच्या १३ व्या वर्षी लग्न, स्वतःच्या मुलाला मांडीवर घेऊन दहावीची परीक्षा, बेकरी कोर्स करून ती कोलकात्याची बेकरी क्वीन बनली. तिच्या मिठाईच्या उद्योगाची वार्षिक उलाढाल २० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. ही प्रेरणादायी गोष्ट आहे, शुगर अँड स्पाइसच्या सुप्रिया रॉय यांची.सुप्रिया रॉयचा जन्म कोलकात्यातील एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. सुप्रियाला सात भावंडे होती. सुप्रियाचे वडील बांधकाम व्यावसायिक होते. अत्यंत कष्टाने त्यांनी व्यवसाय उभारला होता. १९६३ मध्ये, त्या काळातील प्रथेप्रमाणे, सुप्रिया जेव्हा फक्त १३ वर्षांची होती, तेव्हा तिचे लग्न कोलकात्यात राहणाऱ्या मुर्शिदाबादच्या एका जमीनदाराच्या मुलाशी झाले. खरंतर तिला पुढे शिकायचं होतं. पण तिला तिच्या कुटुंबाच्या इच्छेला बळी पडावे लागले. तिचे पती प्रशांत कुमार रॉय त्यावेळी पदव्युत्तर पदवीचा अभ्यास करत होते. सुप्रिया जेव्हा एका बाळाची आई झाली तेव्हा ती दहावीत शिकत होती. बाळाला आपल्या मांडीवर घेऊन तिने त्याकाळी दहावीची परीक्षा दिली. आपण चित्रपटात पाहतो तशीच जमीनदारांचा भला मोठा वाडा सुप्रियाच्या सासरी होता. १९२० च्या दशकात तो बांधला गेला होता. त्याची देखभाल करण्यासाठी दोन डझनहून अधिक लोकांची आवश्यकता होती. मात्र जमीनदारी व्यवस्था संपल्यानंतर सुप्रियाच्या सासरच्यांची आर्थिक परिस्थिती ढासळू लागली होती. ती अनेकदा आपली ढासळती आर्थिक स्थिती पाहून रडत असे. तिला आपल्या मुलाच्या भविष्याची काळजी वाटे. अशा या प्रतिकूल परिस्थितीत तिला एक आशेचा किरण दिसला. तिला लहानपणापासूनच बेकिंगची आवड होती. कलकत्ता विद्यापीठातून पत्रव्यवहाराद्वारे पदवी प्राप्त केल्यानंतर तिने बेकरी, कॉन्टिनेंटल फूड आणि हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर तिने कोलकात्यातील तारातला येथील इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, केटरिंग टेक्नॉलॉजी अँड अप्लाइड न्यूट्रिशनमधून बेकरी, कॉन्टिनेंटल फूड आणि हॉटेल मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम पूर्ण केला.रॉयने तिच्या सासरच्या मंडळींकडून त्यांच्या मोठ्या घराच्या एका भागात कला आणि हस्तकला वर्ग सुरू करण्याची परवानगी मागितली. तिचे कुटुंब महिलांनी काम करण्याबाबत रूढीवादी विचारांचे होते. मात्र सुप्रियाच्या सासऱ्यांनी नेहमीच तिला पाठिंबा दिला. सुप्रियाने १९८५ मध्ये फक्त एका विद्यार्थ्यासह बेकरी वर्ग सुरू केले. अल्पावधीत बेकिंग, कॉन्टिनेंटल आणि भारतीय स्वयंपाक तसेच टेलरिंग आणि टायपिंग शिकण्यासाठी विद्यार्थी रांगेत उभे राहू लागले. सुप्रियाने काही शिक्षक देखील नियुक्त केले.ते १९९० साल होते. सुप्रियाचा मुलगा मोठा झाला होता. ती चाळीस वर्षांची होती. तिने तिच्या आयुष्याची आणि तिच्या कामाची जबाबदारी घेण्याचा निर्णय घेतला. कुटुंबाच्या विरोधाला न जुमानता तिने तिच्या घराच्या आवारात तिचे पहिले बेकरी दुकान 'द शुगर अँड स्पाइस' सुरू केले.२०० चौरस मीटर क्षेत्रात तिचे दुकान तिने थाटले. तिने सुरू केलेल्या वर्गाच्या बचतीतून तीन लाख रुपये जमा केले होते. तेच तिचे भांडवल होते. सोबतीला १२ कर्मचारी होते. ज्यात ती स्वतःही होती. त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. लवकरच त्यांना मौखिक लोकप्रियता मिळू लागली. पती प्रशांत कुमार रॉय यांच्या अधूनमधून सल्ल्याने, व्यवसाय वाढू लागला आणि नफा मिळवू लागला. ९९५ मध्ये पाच वर्षांतच, त्यांनी फ्रँचायझींद्वारे विस्तार करण्याचा निर्णय घेतला. फ्रँचायझींनी राज्यभर बेकरीची उत्पादने उपलब्ध करून देण्यास मदत केली. तिच्या घराच्या ३०,००० चौरस फूट क्षेत्रफळावर उत्पादन केंद्र उभारण्यात आले. सुरुवातीला मालकी हक्काने काम करणारी ही कंपनी १९९८ मध्ये प्रायव्हेट लिमिटेड बनली, त्याच वर्षी तिने फ्रँचायझी देऊ करण्यास सुरुवात केली. १९९८ ते २००० दरम्यान, कंपनीची वाढ दरवर्षी २०० टक्क्यांपर्यंत वाढली आणि पुढील पाच वर्षांत ती ४०० टक्क्यांपर्यंत पोहोचली. २००० मध्ये, सुप्रिया रॉय यांना तत्कालीन लघु उद्योग मंत्रालयाने सर्वोत्कृष्ट महिला उद्योजक (आणि लघु उद्योग म्हणून कामगिरीसाठी) म्हणून राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले, ही पहिलीच वेळ होती जेव्हा बेकरी आणि मिठाई उद्योगाला असा पुरस्कार देण्यात आला.पुढील काही वर्षे व्यवसाय हळूहळू वाढत गेला. मात्र एक दुर्दैवी घटना घडली. २००६ मध्ये, एका विश्वासू कर्मचाऱ्याने आणि आर्थिक मदतनीसाने सुप्रिया रॉय यांची फसवणूक केली. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. हे नुकसान काही कोटी रुपयांचे होते. कंपनी दिवाळखोरीच्या जवळ पोहोचली होती. कर्मचाऱ्यांना पैसे देण्यास असमर्थ आणि कर्जबाजारी असल्याने सुप्रिया यांनी हे आव्हान धडा म्हणून स्वीकारले आणि प्रत्येक गोष्टीवर वैयक्तिकरित्या देखरेख करण्याचा निर्णय घेतला. अखेर २००९ मध्ये पुन्हा कंपनी नफ्यात आली. 'द शुगर अँड स्पाइस' हे आयएसओ ९००१:२००८ प्रमाणित झालेले पहिले बेकर आणि कन्फेक्शनर्स बनले.सुप्रियाची कंपनी डीलर्स आणि वितरकांच्या नेटवर्कद्वारे पश्चिम बंगाल, झारखंड, ओडिशा, भूतान आणि बांगलादेशमध्ये आपली उत्पादने विकते. २०१० च्या अखेरीस, कंपनीकडे आधीच १०० आउटलेट होते. सुप्रियाची कंपनी आता केक, पेस्ट्री, ब्रेड, सँडविच, बर्गर, पिझ्झा, हॉट डॉग, क्रोइसंट, पॅटीज, रोल, कबाब आणि तंदुरी आयटम तसेच चॉकलेट, कुकीज आणि वेफर्स सारख्या पॅकेज केलेल्या खाद्यपदार्थासह ५१ उत्पादने बनवते. पश्चिम बंगालमध्ये शुगर अँड स्पाइसचे १२५ आउटलेट आहेत, त्यापैकी ११० शहरात आहेत. त्यापैकी ४० पूर्णपणे कंपनीच्या मालकीचे आहेत आणि उर्वरित फ्रँचायझी आहेत. एका वेबसाईटनुसार कंपनीची उलाढाल २० कोटी आहे. सुप्रिया रॉय आज बेकरी उद्योगातील एक मानाचे नाव आहे. प्रचंड मेहनत, सातत्य, नवीन गोष्टींचा ध्यास, धाडसी वृत्ती, निडरपणा या गुणांमुळेच सुप्रिया रॉय बेकरी उद्योगातील लेडी बॉस बनल्या आहेत.

# स्किल सोबत विल काळाची गरज

## गुरुकृपा कॉलेज ऑफ फार्मसी येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

महाराष्ट्र सीईटी सेलने फार्मसीची सुरू केलेली प्रवेशाची अंतिम प्रक्रिया संपत आलेली आहे या पार्श्वभूमीवर गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, माजलगाव या महाविद्यालयात डी फार्मसी आणि बी फार्मसी प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंडेक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. कॉलेजचा पहिल्या दिवशीच आयोजित अकॅडमिक इंडक्शन प्रोग्राम हा वर्षभर चालणाऱ्या सिलॅबस आणि कॉलेजचे एक्सट्रा ॲक्टिव्हिटीस याबद्दल माहिती देण्यासाठी असतो.

गुरुकृपा महाविद्यालय आयोजित या प्रोग्राम मध्ये बायनेट फार्मा कंपनीचे डायरेक्टर माननीय श्री. बालाजी सांगळे यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी मधील विविध करिअर संधीची माहिती सांगितली. कॉलेजच्या पहिल्या दिवशीच तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन मिळणे हे दुर्मीळच पहायला मिळते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांत उत्सास वाढला.

सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन सानिया पठाण व साक्षी तोर या विद्यार्निनीने केले तर प्रास्ताविक प्राचार्य अमित बिंदू यांनी केले. या कार्यक्रमात प्रा. गणेश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना कॉलेज स्टाफची ओळख करून दिली, अकॅडमिक कॅरिक्युलम आणि एक्झाम बद्दल प्रा. ऋषिकेश



शेंडगे आणि प्रा. दिवाकर जगताप यांनी माहिती सांगितली त्याच बरोबर प्रा. राहुल वांडरे यांनी जॉब संदर्भात माहिती दिली तसेच इन्स्टिट्यूटिनल ओव्हर व्हिव आणि रिचर्स संदर्भात प्रा. डॉ. निखिल जाधव यांनी गायडन्स केले. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक गोष्टी शिकण्याचे आव्हान करत अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्श दीपाली गायकवाड हिने केले. या कार्यक्रमाचा साठी प्र. पाहुणे म्हणून फिजिओथेरपीचे प्राचार्य मकेश बाबू, आयुर्वेदचे विभाग प्रमुख डॉ. साबेर शेख, नर्सिंगच्या प्रा. पूनम खानापूरकर उपस्थित होते.

# केज खरेदी-विक्री संघात सोयाबीन,उडीद व मुगाची ऑनलाईन नोंदणी करावी-बालासाहेब बोराडे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुका खरेदी-विक्री संघ नाफेड अंतर्गत आधारभूत किमतीने सोयाबीन,उडीद व मूग खरेदी योजना २०२५ - २०२६ सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.या खरेदी केंद्रांतर्गत शेतकऱ्यांचे सोयाबीन, उडीद व मूग या पिकांची शासकीय हमीभावाने खरेदी होणार आहे याची ऑनलाईन नोंदणीप्रक्रिया खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात सुरु करण्यात आल्याची माहिती चेअरमन बालासाहेब बोराडे यांनी दिली आहे. खरेदी-विक्री संघ शेतकऱ्याला त्यांच्या शेत मालाची वेळेवर खरेदी व्हावी व योग्य भाव मिळावा म्हणून खा. बजरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सतत क्रियाशील व प्रयत्नशील राहिलेला आहे.प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी शासनाने



हमीभावाप्रमाणे खरेदी केंद्र सुरु करण्यास परवानगी दिली आहे.या शासकीय खरेदी केंद्रावर सोयाबीनला ५३२८ रुपये मूग ७८०० रुपये तर उडीद ८७६८ रुपये प्रति क्विंटल हा हमीभाव निश्चित करण्यात आला आहे.ऑनलाईन नोंदणीसाठी ७/१२,८ अ उतारा(ई पीकपाहणीसह), आधारकार्ड,बँक पासबुक घेऊन संबंधित शेतकरी बांधवाने नोंदणीसाठी उपस्थित राहणे बंधनकारक व अनिवार्य आहे.नोंदणीची अंतिम तारीख ३१ डिसेंबर असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली तसेच प्रत्यक्ष खरेदी १५ नोव्हेंबर पासून सुरुहोणार असल्याने जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी नोंदणी करून घ्यावी असे आवाहन चेअरमन बालासाहेब बोराडे,व्हाईस चेअरमन दत्तात्रय (पिंटु) ठोंबरे यांच्यासह सर्व संचालक मंडळाने केले आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी चे थकित मानधन तात्काळ द्या-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या बेरोजगार युवा प्रशिक्षणार्थीना त्यांच्या थकीत मानधनाच्या समस्येवर तोडगा काढण्याची मागणी केली आहे विशेष म्हणजे पहिल्या टप्प्यातील जानेवारी,फेब्रुवारी महिन्याचे मानधन एक वर्ष उलटूनही मिळालेले नाही.दुसऱ्या टप्प्यातील मानधन थकीत आहे त्यामुळे प्रशिक्षणार्थी मध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.शिक्षणाधिकारी बीड यांना ग्रामीण युवक संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात येणार आहे. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे सुशिक्षित बेरोजगारीच्या श्रम आणि वेळेचा अपमान होत असल्याची भावना प्रशिक्षणार्थ्यांनी व्यक्त केली आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रमुख समस्या आणि मागण्या आहेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या पहिल्या टप्प्यातील जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याचे मानधन एक वर्ष उलटूनही मिळालेले नाही.जुलै मध्ये ऑर्डर मिळूनही जुलै,ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर या चार महिन्याचे मानधन अद्याप मिळालेले नाही. नोव्हेंबर महिना सुरू झाला असून दसरा होऊन गेला आणि दिवाळी अंधारात गेली सणासुदीत मानधन न मिळाल्याने कुटुंबाच्या आर्थिक गरजा पूर्ण करताना प्रशिक्षणार्थीना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला या निवेदनात प्रशिक्षणार्थीने प्रशासनाच्या उदासीनते वर कठोर टीका केली आहे.बेरोजगार तरुणांना त्यांच्या मानधना साठी प्रशासनाच्या दारात यावे लागते ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.प्रशिक्षणार्थीने पुढील तीन स्पष्ट मागण्या केल्या आहेत जानेवारी, फेब्रुवारी या मागील थकीत महिन्याचे मानधन त्वरित अदा करावे जुलै ते ऑक्टोबर या महिन्याचे थकित मानधन येत्या आठ दिवसाच्या आत अदा करावे भविष्यात प्रशिक्षणार्थीचे मानधन दर महिन्याच्या पाच तारखे पर्यंत नियमितपणे जमा होईल यासाठी ठोसयंत्रणा तयार करावी प्रशासनाने बेरोजगार तरुणांची कुचेष्टा थांबवावी अन्यथा ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.



# जगदीश गुरखूदे यांच्या वाढदिवसा निमित्त बेघर अनाथ आश्रमात अन्नदान



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

वार्ड क्रमांक ७ चे भाजपाचे लोकप्रिय नगरसेवक जगदीश गुरखूदे यांचा वाढदिवस (दि.१२) रोजी पार पडला. या वाढदिवसानिमित्त बेघर अनाथ आश्रमातील अनाथ वृद्धाना एक वेळचे जेवण आणि आर्थिक मदत देण्यात आली.

शहरातील भाजपाचे एकमेव माजी नगरसेवक जगदीश गुरखूदे यांचा वाढदिवस (दि.१२) रोजी 'द्वारकाधीश भवन' या ठिकाणी कार्यकर्त्याकडून अगदी उत्साहात साजरा करण्यात आला. जगदीश गुरखूदे हे भाजपाचे एकमेव नगरसेवक असल्यामुळे त्यांचा शहरात, वार्डात भरपूर प्रमाणात चाहता वर्ग आहे. दरवर्षी त्यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो. यावर्षी देखील त्यांच्या वाढदिवसानिमित्त द्वारकाधीश मित्र मंडळाचा सदस्य योगेश शेणकुडे याच्याकडून शहरातील बेघर अनाथ आश्रम या ठिकाणी अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनाथ आश्रमातील वृद्ध व्यक्तींना एक वेळचे जेवण आणि आर्थिक मदत देण्यात आली. या कार्यक्रमाला यश गुरखूदे, आकाश भोसले, गौरव वाजपेयी, राजू भोसले, रोहित कुलकर्णी, अभिषेक काळे, कुमार दोडके, आदेश गायकवाडसह द्वारकाधीश मित्र मंडळातील इतर सदस्य उपस्थित होते.

# नियोजनबद्ध आत्मघाती हल्ला

दिल्लीच्या लाल किल्ल्यानजीक घडवलेला बॉम्बस्फोट आणि त्यात वापरलेली स्फोटके पाहता हे अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने घडवलेले दहशतवादी कृत्य मानता येते. 'जैश-ए-मोहम्मद' या अतिरेकी संघटनेशी संबंधित दहशतवाद्यांनी देशाच्या राजधानीमध्ये स्फोट घडवून सुरक्षा यंत्रणांना आव्हान दिले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या सुमारास स्फोट घडवून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे. यंदा २२ एप्रिलला पाकिस्तानी दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पुलवामा येथे केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा बळी गेला. भारताने ६ मेच्या रात्रीपासून ४ दिवस पाकिस्तानमध्ये घुसून 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबवली. 'जैश-ए-मोहंमद'सह अन्य दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. शंभरहून अधिक दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. त्यातही 'जैश'चा म्होरक्या मसूद अजहरच्या कुटुंबाचा खात्मा करण्यात आला. त्यामुळे चवताळलेली 'जैश' स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये नाक कापल्यानंतर पाकिस्तानमधील दहशतवादी गट काहीतरी करणार हे अपेक्षित होतेच. त्यामुळे तर 'जैश'ने आता महिलांची दहशतवादी ब्रिगेड स्थापन करून भारताविरोधात वापरण्याचे ठरवले होते. अलीकडेच 'जैश'चा म्होरक्या मसूदने भारतात दहशतवादी कारवाया करण्याची धमकी दिली. त्यानंतर भारतातील तपास यंत्रणा सक्रिय झाल्या. जम्मू-काश्मीर, फरिदाबाद, लखनऊ, अहमदाबाद येथून काहीजणांना अटक केली. यातील बहुतेकांचा 'जैश'शी संबंध आहे. भारताचा मानबिंदू असलेल्या लाल किल्ला परिसरातील मेट्रो स्टेशनजवळ अतिशय नियोजनबद्धतेने स्फोट घडवत सामान्य नागरिकांच्या मनात दहशत निर्माण करता आली हे महत्त्वाचे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय तपास संस्था, दिल्ली पोलीस, केंद्रीय अन्वेषण विभाग, फॉरेन्सिक यंत्रणा तसेच अन्य घटकांशी चर्चा करून दिल्लीच्या स्फोटाचे मूळ शोधायला सुरुवात केली. फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांनी घटनास्थळावरून पुरावे गोळा केले. दिल्ली पोलीस, 'एनआयए', 'एनएसजी' आणि 'एफएसएल'च्या पथकांनी तपास सुरू केला. घटनास्थळाभोवती असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. कोणत्याही दहशतवादी संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली नसली, तरी पूर्वी अटक केलेल्यांच्या तपासातून त्यांचा 'जैश'शी आणि अटक केलेल्यांचा दिल्ली बॉंबस्फोटाशी संबंध जोडला जात आहे. स्फोटानंतर राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील सुरक्षा संस्थांना सतर्क करण्यात आले. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) दिल्ली मेट्रो, लाल किल्ला, सरकारी इमारती आणि इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळासह सर्व संवेदनशील ठिकाणी सुरक्षा कडक केली. संवेदनशील प्रतिष्ठानांवर अतिरिक्त दल तैनात करण्यात आले असले, तरी हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. कोणत्याही दहशतवादी घटनेनंतर देशात काही दिवस सतर्कता बाळगली जाते आणि नंतर दुर्लक्ष केले जाते.

दरम्यान, केंद्रीय एजन्सींसह हरियाणा आणि उत्तर प्रदेश पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये 'जैश-ए-मोहम्मद' आणि 'अन्सार गजवत-उल-हिंद'शी संबंधित 'एका व्हाईट कॉलर' दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करण्यात आला. तो काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये पसरला होता. अटक केलेला संशयित दहशतवादी डॉ. मुझमिल अहमद गनी उर्फ मुसैब याच्या तपासातून पोलीस यंत्रणेला मिळालेली माहिती धक्कादायक आहे. त्याच्याशी संबंधित महिला डॉ. शाहीन हिला अलीकडेच लखनऊमध्ये अटक करण्यात आली. तिच्या कारमधून एके-४७ रायफल जप्त करण्यात आली. यापूर्वी, अनंतनाग येथील रहिवासी डॉ. आदिल अहमद याला ७ तारखेला सहारनपूरमध्ये अटक करण्यात आली. तो अनंतनाग येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत होता. आरिफ निसार दार, यासिर-उल-अशरफ आणि मकसूद अहमद दार उर्फ शाहिद हे नौगाम, श्रीनगरचे, मौलवी इरफान अहमद शोपियानचा, जमीर अहमद अहंगर हा गंदरबलचा, डॉ. मुझम्मिल अहमद गनई आणि डॉ. आदिल हे कुलगाममधील नागरिक आहेत. स्फोट झालेल्या कारच्या विक्रीचे टप्पे पाहिल्यास हे कनेक्शन पुलवामापर्यंत पोहोचते. या प्रकरणात डॉ. उमरसह आणखी काहीजणांना अटक होण्याची शक्यता आहे. मुझम्मिल आणि आदिलच्या फोनवर अनेक पाकिस्तानी नंबर सापडले. मुझम्मिल अल फलाह विद्यापीठात डॉक्टर म्हणून काम करत होता. २,९०० किलो



स्फोटकांपैकी ३६० किलो स्फोटके आणि काही शस्त्रे तसेच दारूगोळा डॉ. मुझम्मिलच्या फरिदाबादमधील भाड्याच्या घरातून जप्त करण्यात आला. फतेहपूर तागा गावातील एका खोलीतून २,५५० किलो अमोनियम नायट्रेट जप्त करण्यात आले. मुझ्झमिलने श्रीनगरमध्ये 'जैश-ए-मोहम्मद'च्या समर्थनार्थ पोस्टर्स लावली होती. दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करून, सुरक्षा यंत्रणांनी 'जैश-ए-मोहम्मद' आणि भारतातील 'इसिस'चा गट 'अन्सार गजवत-उल-हिंद'च्या धोकादायक योजना उधळून लावल्या; परंतु दिल्लीच्या कटाचा सुगावा लागला नाही.

जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटचा वापर शेकडो अत्यंत शक्तिशाली आयईडी (इम्प्रोवाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइसेस) बनवण्यासाठी केला गेला असता. अमोनियम नायट्रेट हे एक पांढरे, पावडरसारखे रसायन आहे. ते फार महाग नसते. त्यात डेटोनेटर, बॅटरी आणि टायमर जोडल्याने एक घातक बॉम्ब तयार होतो. डॉ. मुझम्मिल अहमद गनी उर्फ मुसैब याने चौकशीदरम्यान कबुली दिली. त्याच्या पाकिस्तानी हँडलरने त्याला सांगितलं होतं, की या वेळी स्फोट इतका भयानक असेल, की मृतांची संख्या हजारोंमध्ये जाईल. दहशतवादी संघटनेची ही धोकादायक योजना अमलात आणण्यासाठी २९०० किलो स्फोटके फरिदाबादला पाठवण्यात आली होती. फरिदाबादमधील यात्रेला लक्ष्य करण्याचा दहशतवाद्यांचा कट होता. त्यात डॉ. शाहीन सहभागी होती. या यात्रेला सुमारे ४० हजार लोक उपस्थित होते. यात्रेला लक्ष्य करण्यापूर्वी संशयित दहशतवादी मुसैबला अटक करण्यात आली. त्यामुळे त्याचा कट उधळला. डॉ. उमर त्यांच्या कटात सहभागी होता. त्याचा संबंध दिल्ली बॉम्बस्फोटाशी जोडला जात आहे. तो अजूनही तपास यंत्रणांना सापडलेला नाही.

२०१९ मध्ये दहशतवाद्यांनी पुलवामा येथे अशाच प्रकारच्या स्फोटकांनी भरलेल्या वाहनाचा स्फोट केला. त्यात ४० सैनिकांचे बलिदान झाले. कारमध्ये झालेल्या स्फोटाच्या कारणाबद्दल अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. या घटना स्थानिक पातळीवर घडल्या होत्या की त्यांचा देशाबाहेर संबंध होता? उमर मोहम्मदच दुर्घटनाग्रस्त आय-२० कार चालवत असल्याचा संशय आहे. पोलीस आता कारच्या ड्रायव्हरच्या सीटवर सापडलेल्या मृतदेहाची डीएनए चाचणी करत आहेत. दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाला सीसीटीव्ही फुटेजमधून अनेक महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत. दहशतवादी गटांकडून वापरली जाणारी ही एक प्रसिद्ध कार्यपद्धती आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या फॉरेन्सिक आणि दहशतवादविरोधी पथकांना काही आश्चर्यकारक गोष्टी आढळल्या. अशा बॉम्बस्फोटांनंतर जमिनीवर एक खड्डा तयार होतो आणि शार्पनेल विखुरलेले असते; परंतु येथे असे काहीही आढळले नाही. आरडीएक्स आणि अमोनियम नायट्रेटचे मिश्रण किंवा अत्यंत ज्वलनशील रसायन वापरण्यात आल्यामुळे खड्डा पडला नसावा, असा तज्ज्ञांचा अंदाज होता. हा आत्मघातकी हल्ला होता का याचाही तपास पोलीस करत आहेत. तथापि, या सिद्धांतावर प्रश्न उपस्थित करणारी एक बाब म्हणजे स्फोटाच्या वेळी कारमध्ये तीन लोक होते. सहसा आत्मघातकी हल्ल्यांमध्ये फक्त एक किंवा दोन लोक असतात. लाल किल्ल्याअगोदर ही कार सुन्हेरी मशिदीजवळ गाडी दिसली. ती दोन तास तिथेच राहिली. त्यानंतर ती लाल किल्ल्याकडे नेण्यात आली. बहुतेक लोकांच्या मृतदेहावर शार्पनेलचे कोणतेही चिन्ह नव्हते. एकंदरीत, दिल्लीच्या घटनेमागे मोठे षडयंत्र असून त्यातून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा हेतू होता, हे स्पष्ट दिसते.

# विविध कार्यक्रमाने हंसराज अहीर यांचा वाढदिवस साजरा

## रक्तदान शिबीर,रूग्णांना चष्मे वाटप,परिचारीका सत्कार व अन्य सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराजभैय्या अहीर यांच्या वाढदिवसानिमित्त चंद्रपूर जिल्ह्यामध्ये भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांनी दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून वाढदिवस साजरा केला. चंद्रपुरात भाजपा, भाजयुमो, महिला आघाडी व अन्य आघाड्यांच्या वतीने शनि मंदिर, पांढरकवडा येथील हनुमान मंदिर तसेच वढा येथे पुजा–अर्चना करून त्यांच्या दीर्घायुष्याकरिता सामुहिक प्रार्थना केली. लालपेठ येथील श्यामाप्रसाद मुखर्जी शाळेत आमदार किशोर जोरगेवार यांच्या शुभहस्ते आरोग्य व नेत्रचिकित्सा शिबिराचे उद्घाटन पार पडले. ६०० रूग्णांना शिबिर स्थळी चष्मे वाटप करण्यात आले.लोकमान्य टिळक कन्या प्राथ. शाळा व म.ज्योतिबा फुले शाळेमध्ये व शहरातील अन्य शाळांमधील विद्यार्थ्यांना नोटबुक्स व पेनचे वितरण करण्यात आले. बंगाली कॅम्प तसेच अष्टभुजा व रमाबाई नगर येथे मसाला भात वितरण केले. सफाई कामगारांचा सत्कार सेफ्टी किट भेटवस्तुंचे वितरण,





महाकाली वार्डातील चंडिका माता मंदिर येथे भव्य रक्तदान शिबीर, लाडक्या बहिनींची ई–केवायसी, बाबुपेठ येथे बचतगट महिला व आधार केंद्रातील निराधार महिलांना गृहपयोगी साहित्य वाटप, जटपुरा येथे युवा मोर्चा द्वारा दुध वाटप, ओबीसी मोर्चाद्वारे जोडदेऊळ येथे महाआरती व लाडू वाटप, डेबु सावली येथे वृध्द बांधवांना साहित्य वितरण, सामान्य रूग्णालयातील रूग्णांना दुध व फळ वितरण, बाबुपेठ येथे ८० परिचरीकांचा सत्कार व गौरव, प्यार फाऊंडेशन येथे मुक्या प्राण्यांना खाद्य वाटप, आशा वर्कर्सचा सत्कार, काशी विश्वनाथ मंदिरात सुंदरकांड आदी कार्यक्रम संपूर्ण दिवसभर आयोजित करण्यात आले.वरील सर्व कार्यक्रमास माजी उपमहापौर अनिल फुलझेले, भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहीर व अन्य पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देवून आयोजकांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता तुषार सोम, विनोद खेवले, नामदेव डाहुले, विनोद शेरकी, दिनकर सोमलकर, मयुर भोकरे, मयुर हेपट, प्रा.रवि जोगी, अक्षय शेंडे, राम हरणे, शाम कनकम, स्वप्निल डुकरे, ॲड. सारीका संदूरकर, मुग्धा खांडे, राजेश वाकोडे, स्वप्निल मुन, रामकुमार आकापेल्लीवार, पुष्पा उराडे, सुवर्णा लोखंडे, सायली येरणे, कौसर खान, भाग्यश्री हांडे, उमेश ऐलू, सुदामा यादव, उग्रसेन पांडे यांचेसह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# मागासवर्गीय म्हाडा इमारतींचा रखडलेला पुनर्विकास योजना

## स्वयं पुनर्विकासाबाबत म्हाडा कार्यालयात बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मागासवर्गीय समाजासाठी युद्धोत्तर पुनर्वसन योजनेतून उभ्या रहिलेल्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाच्या प्रश्नावर नुकतीच म्हाडा कार्यालयात केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री खा. रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी आठवले यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाच्या कार्यालयालाही सदिच्छा भेट दिली.या बैठकीला आरपीआय आठवले गटाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, उत्तर मुंबईचे जिल्हा प्रमुख रमेश गायकवाड यांसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीत आ. दरेकर यांनी



समाजकल्याण विभागाच्या शासन निर्णयातील जाचक अटींमुळे कन्नमवार नगरमधील अनेक इमारतींचा पुनर्विकास रखडलेला आहे. युद्धोत्तर पुनर्वसन योजने अंतर्गत मागासवर्गीय ग्राहकांना ठराविक इमारतींमध्ये घरे खरेदी करण्यासाठी. शासकीय संस्थेच्या माध्यमातून कर्ज दिले होते. समाजकल्याण विभागाने १० टक्के अनुदान दिले होते. याच आधारे मुंबईतील दीडशे गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकास करण्यासाठी समाजकल्याण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले होते. हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी २०२३ च्या शासन निर्णयात समाजकल्याण विभागाने जाचक अटी घातल्या आहेत. या अटी पूर्ण होणे शक्य नसल्याने मुंबईतील १५० इमारतींचा पुनर्विकास रखडलेला आहे. पुनर्विकास रखडल्याने कन्नमवार नगर येथील इमारत क्रमांक २१५ ने मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या इमारतीत मागासवर्गीय ग्राहकांनी घरे घेतल्यानंतर योजनेत अनेक सुधारणा झाल्या. या सुधारित योजनेचा लाभ इमातीने घेतलेला नाही. त्यामुळे हा शासन निर्णय या इमारतीला लागू होत नसल्याचे हायकोर्टाने निकालात म्हटले असल्याच्या बाबी निदर्शनास आणून दिल्या.

# हिंगोलीतील १३०० हेक्टर शेती सिंचना खाली येणार:दोन साठवण तलावांसाठी २१४ कोटींच्या तरतुदीस राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

दैनिक वादळ वार्ता

**हिंगोली (वृत्तसंस्था)**–हिंगोली जिल्ह्यात जलसंपदा विभागामार्फत हाती घेतल्या जाणाऱ्या डिग्रस व सुकळी साठवण तलावाच्या २१४ कोटी रुपयांच्या खर्चाच्या तरतुदीस मंगळवारी ता. ११ राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. त्यामुळे या साठवण तलावाच्या बांधकामाचा मार्ग मोकळा झाला आहे. या तलावांमुळे १३०० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे.हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष शिल्लक असून या अनुशेषांतर्गत सिंचनासाठी जास्तीत जास्त कामे करण्याची मागणी केली जात आहे. त्यानुसार कयाधू नदीवरील बंधाऱ्यासोबतच साठवण तलावांची कामे करण्याची मागणीही केली जात आहे. त्यासाठी आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी शासनाकडे पाठपुरावा देखील केला आहे.जलसंपदा विभागामार्फत सेनगाव तालुक्यातील सुकळी व डिग्रस येथे साठवण तलावाचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता अण्णाराव कांबळे यांनी शासनाकडे सादर केला होता. या दोन्ही तलावासाठी किती जमीन संपादीत करावी लागेल, किती रुपयांचा खर्च अपेक्षीत आहे, किती पाणीसाठा होईल यासर्व बाबी या प्रस्तावांमध्ये नमुद करण्यात आल्या होत्या. त्यानंतर आज शासनाने २१४ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता दिली आहे.

त्यानुसार सुकळी साठवण तलावामधे ४.७० दशलक्ष घनमिटर पाणीसाठा होणार असून त्यासाठी १६३ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. या तलावाद्वारे ६७७ हेक्टर शेती सिंचनाखाली येणार आहे. तलावाच्या भुसंपादनासोबतच इतर कामांसाठी १२४.३६ कोटींच्या खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे.या शिवाय डिग्रस येथील साठवण तलावात ३.७४ दशलक्ष घनमिटर पाणीसाठा होणार असून त्यासाठी १६० हेक्टर जमीन संपादीत केली जाणार आहे. तलावातील पाण्याद्वारे ६०३ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. या तलावाच्या कामासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे.दरम्यान, शासनाकडून खर्चाला मान्यता मिळाल्यानंतर आता जलसंपदा विभागाकडून तातडीने पुढील कार्यवाही केली जाणार असून भुसंपादनाचे काम पूर्ण झाल्यानंतर तातडीने तलावाच्या बांधकामाला सुरवात केली जाणार आहे. त्यासाठी किमान एक वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आमदार भोंगळे यांची तत्परता

## कोमल फरकडे यांच्या मागणीला मिळाला तातडीचा प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**गोंडपिंपरी । प्रतिनिधी**

गोंडपिंपरी तालुक्यात सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून उत्पन्नात घट झाली आहे. त्यामुळे शेतकरी बांधव आर्थिक अडचणीत आणि नैराश्याच्या छायेत आहेत. त्यातच व्यापाऱ्यांकडून कापसाला कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान आणखीनच वाढले आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा आणि त्यांच्या उत्पादनाची खरेदी सुलभ व्हावी, यासाठी गोंडपिंपरी तालुक्यातील सीसीआय (कापूस खरेदी केंद्र) तसेच धान खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्याची मागणी कोमलताई फरकडे यांनी माननीय आमदार देवराव भोंगळे यांच्याकडे केली.या मागणीची दल घेत आमदार भोंगळे यांनी संबंधित विभागाशी तात्काळ दूरध्वनीद्वारे संपर्क साधून खरेदी केंद्र सुरू



करण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या. त्यांच्या या तातडीच्या प्रतिसादामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.शेतकऱ्यांच्या अडचणींवर संवेदनशीलतेने प्रतिसाद देणारे आणि त्यांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे राहणारे आमदार देवराव दादा भोंगळे यांच्या या कार्याबद्दल कोमलताई फरकडे यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून कट्टर विरोधक संजय राऊत यांच्या तब्येतीची चौकशी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते, राज्यसभा खासदार संजय राऊत आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राच्या राजकरणातील कट्टर विरोधक आहेत. परंतु महाराष्ट्राच्या राजकारणाची परंपरा आहे की, कट्टर शत्रू किंवा विरोधक जरी असला तरी संकटाच्या वेळी सगळे धावून जातात. त्याचीच प्रचिती देणार एकनाथ शिंदेंचा व्हिडीओ समोर आला आहे. एकनाथ शिंदेवर संजय राऊतांवर टीका करायचे परंतु आज एकनाथ शिंदेंनी संजय राऊत यांचे बंधू आमदार सुनील राऊत यांना फोन करून तब्येतीची विचारपूस केली आहे.राज्याच्या राजकारणामध्ये सध्या सर्वच नेते टोकाची विरोधी भूमिका घेताना दिसून येतात. राजकीय नेते एकमेकांवर जोरदार आरोप करत असून खालच्या पातळीवर जाऊन





टीका करताना दिसून येतात. मात्र आज राजकारण बाजूला सारून राजकीय संस्कृतीचं दर्शन घडल्याचं बघायला मिळत आहे. शिवसेना नेते संजय राऊत यांची प्रकृती अचानक बिघडली असून घराबाहेर पडण्यास मज्जाव केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींपाठोपाठ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि आता एकेकाळजी सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांचे भाऊ सुनील राऊत यांना फोन करून त्यांच्या तब्यतेची विचारपूस केली आहे.

शिवसेना ठाकरेंच्या पक्षाचे खासदार संजय राऊत यांना गंभीर आजार झाल्याची माहिती समोर आलीय. यामुळे संजय राऊतांनी पुढील दोन महिने सार्वजनिक जीवनापासून पूर्णपणे दूर राहण्याचा निर्णय घेतलाय. ते आता थेट नवीन वर्षात सार्वजनिक जीवनात पुनरागमन करणार आहे. खासदार संजय राऊत सध्या आजारी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याविषयी संजय राऊत यांनी माहिती दिल्यानंतर राजकीय मित्र, राजकीय विरोधक यांनी त्यांना फोन, मेसेज करत लवकर बरं होण्याच्या शुभेच्छा दिल्या होत्या.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी संजय राऊत यांचे बंधू सुनील राऊत यांना फोन केला. फोनवरून संवाद साधला आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांना लवकर बरे व्हावे अशी शुभेच्छा दिल्या.

# माझी लाडकी बहीण' योजनेच्या 'केवायसी'मध्ये अडचणी



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाखो लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत पाठवली जाते, ज्यामुळे महिलांना मोठा आधार मिळतो. सध्या राज्य सरकारने सर्व लाभार्थी महिलांना ई–केवायसी करण्याचे आवाहन केले असून त्यासाठी संकेतस्थळही उपलब्ध करून दिले आहे. मात्र, ही ई–केवायसी करताना येत असलेल्या अनेक तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. असे असतानाच, आता महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी सर्व लाभार्थी महिलांना एक महत्त्वाची माहिती देऊन मोठा दिलासा दिला आहे.मंत्री अदिती तटकरे यांनी महिती दिली की, लाडकी बहीण योजनेच्या संकेतस्थळामध्ये काही बदल होत आहेत, त्यामुळे वेळ लागत आहे. ज्या महिलेला पती आणि वडील नाही त्यांना केवायसी करता येत नाहीये. हीच अडचण लक्षात घेऊन आता संकेतस्थळात महत्त्वाचे बदल केले जात आहेत. या बदलांमुळे आता सर्व महिलांना केवायसी करता येईल. त्यासाठीच हे बदल केले जात आहेत, असे तटकरे यांनी सांगितले आहे.केवायसी करण्याची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर २०२५ आहे. त्यामुळे लवकरात लवकर केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महिलांचा प्रयत्न सुरू आहे. परंतु, सध्या संकेतस्थळात काही बदल केले जात असून त्यामुळे वेळ लागत असल्याची माहिती अदिती तटकरे यांनी दिली आहे. तर मग अंतिम मुदत वाढवून देणार का? असा प्रश्न महिलांनी उपस्थित केला आहे. यावर आता सरकार काय निर्णय घेणार याकडे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.लाडकी बहीण योजनेच्या संकेतस्थळावर सध्या केवायसी करताना खूप अडचण येत आहे. या तांत्रिक अडचणीवर तटकरे यांनी भाष्य करताना म्हटले की, महिलांना येत असलेली तांत्रिक अडचण लक्षात घेण्यात आले आहेत. सध्या संकेतस्थळात काही बदल करण्यात येत आहेत. हे बदल झाल्यानंतर कोणतीही अडचण येणार नाही. लगेच केवायसीची प्रक्रिया पूर्ण होईल, असे आदिती तटकरे यांनी सांगितले आहे.



# नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी 'ई-नामांकना' बाबत आयोगाचे स्पष्टीकरण; १५ नोव्हेंबरलाही अर्ज स्वीकारणार!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १३ रोजी एक महत्त्वाचे प्रसिद्धिपत्रक जारी केले आहे. उमेदवारांनी संकेतस्थळावर फक्त नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरावी, त्यासोबत कोणतेही कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्ट निर्देश आयोगाने दिले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारी अर्ज भरण्यासाठी https://mahasecelec.in हे संकेतस्थळ विकसित केले आहे. आयोगाने स्पष्ट केल्यानुसार, इच्छुक उमेदवारांना या संकेतस्थळावर नोंदणी करून फक्त नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरणे बंधनकारक आहे. संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरल्यानंतर उमेदवारांनी त्याची मुद्रित प्रत (प्रिंटआऊट) घ्यावी.या प्रिंटआऊटवर उमेदवाराची स्वतःची तसेच सूचकांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. हा स्वाक्षरी केलेला मूळ अर्ज आणि त्यासोबत आवश्यक असणाऱ्या इतर कागदपत्रांचा संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करणे बंधनकारक आहे. आवश्यक कागदपत्रांमध्ये नगरपरिषद/नगरपंचायतीचे नादेय प्रमाणपत्र, शौचालय वापराचे प्रमाणपत्र/स्वयंघोषणापत्र, बँक खात्याचा तपशील, राखीव जागेसाठी जातप्रमाणपत्र आणि पक्षाचा उमेदवार असल्यास 'जोडपत्र- १' किंवा 'जोडपत्र- २' यांचा समावेश आहे. नामांकन प्रक्रियेसाठी संकेतस्थळ १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत २४ तास सुरू राहणार आहे. इच्छुक उमेदवार या वेळेपर्यंत नोंदणी करू शकतात. मात्र, नामनिर्देशनपत्र आणि संपूर्ण कागदपत्रांचा संच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष सादर करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. मतदार आणि उमेदवारांसाठी एक महत्त्वपूर्ण माहिती आयोगाने दिली आहे. १५ नोव्हेंबर २०२५ या सुटीच्या दिवशीसुद्धा सर्व कागदपत्रांसह नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचे निर्देश सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे शनिवारच्या सुटीमुळे उमेदवारांचे नुकसान होणार नाही. परंतु, रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ या दिवशी मात्र नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. आयोगाचे उपसचिव जगदीश मोरे यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. इच्छुक उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना निर्देश देण्यात आले आहेत. उमेदवारांनी नोंदणी करताना तयार केलेला लॉगीन आयडी व पासवर्ड जपून ठेवणे आवश्यक आहे.




# राष्ट्रवादीच्या संध्याताई दिपक देशमुख यांचा परळी नगर परिषदेच्या प्रचाराचा धुमधडाका

## शहरातील मतदारांच्या गाठीभेटीची पहिली फेरी पूर्ण

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या संभाव्य उमेदवार सौ.संध्याताई दिपक नाना देशमुख यांनी परळी नगर परिषदेच्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणूक प्रचाराचा धुमधडाका सुरू असून सौ.संध्याताई देशमुख यांनी परळी शहरातील सर्व प्रभागातील मतदारांच्या गाठीभेटीची पहिली फेरी पूर्ण केली आहे.



परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच पक्षप्रवेश केला होता. पक्षाच्या वतीने सौ.संध्याताई देशमुख यांनाच उमेदवारी देण्यात येणार आहे.त्यापूर्वीच दिपक देशमुख यांनी परळी शहरात आपला प्रचार सुरू केला होता.पक्ष प्रवेशा नंतर सौ.संध्याताई देशमुख यांनी परळी शहरातील सर्व प्रभागातील मतदारांच्या गाठीभेटी वर भर दिला.त्यांच्या सोबत कैसर शेख, फरजाना शेख,रोजाना शेख, उमा गर्जे,शिवकन्या भोसले,सीता ताई हिंगणे,सावित्री करडे,सुमन साखरे,भाग्यश्री डांगे यांना सोबत घेऊन,शहरातील विविध भागात संवाद साधला व नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तसेच नगरसेवक पदासाठी उमेदवारी मिळालेल्या सर्व नगरसेवकांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

# केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाची विद्यार्थिनी अश्विनी दहीभाते गोळा फेक स्पर्धेत प्रथम



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर द्वारा आयोजित जिल्हा स्तरीय थलेटिक्स स्पर्धेमध्ये बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाची बी.एस्सी.तृतीय वर्षात शिकणारी विद्यार्थिनी कु. दहिभाते अश्विनी महादेव हिचा प्रथम क्रमांक आला असुन तिची सेंट्रल झोन साठी निवड झाली आहे. अश्विनी दहीभाते च्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर,डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजी नगर च्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या अर्चनाताई आडसकर,प्राचार्य डॉ. माधवराव फावडे, अधिक्षकपी. एस.भोसले,डी.एस.यादव यांनी अभिनंदन केले आहे.बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाच्या वतीने अश्विनी दहीभाते व तिचे पालक यांचा सत्कार प्राचार्य डॉ.माधवराव फावडे यांनी केला.या प्रसंगी डी.एस.यादव, डॉ.सचिन शिंदे,डॉ.सौ. रतन गंगणेडॉ.अनिल गायकवाड,डॉ.काळम, डॉ.सरसरे व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# ए.डी.फाउंडेशन चा महाराष्ट्र नारीशक्ती समाजरत्न पुरस्कार २०२५ अनिता ठाकूरांना जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अनुश्री धनश्री फाउंडेशन सांगली,यांच्या वतीने दरवर्षी समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जातो. अनिता ठाकूर या स्वातंत्र्य सेनानी संग्रामसिंग चौहान यांच्या नात व वामनराव ठाकूर यांच्या स्नुषा आहेत त्यांना माहेरी,सासरी या दोन्हीकडे समाज कार्याचे बाळकडू मिळाले.त्यांनी ज्ञानप्रबोधिनी येथे प्रसाद चिक्षे,अभिजित जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली बालवाडी शिक्षिका म्हणून काम केले.त्या नंतर विमलताई मुंदडा यांच्या पारिवारीक संबंधात आल्या.त्या कालावधीत त्यांनी तहसील अंतर्गत दक्षता समिती,स्वा.रा.ती. रुग्णालय अभ्यागत मंडळ,भ्रष्टाचार निर्मुलन समिती अशा अनेक शासकीय,निमशासकीय समितीवर कार्य केले. तसेच स्वातंत्र्य सैनिक वसाहतीमध्ये विविध महिलांना एकत्र करून बचत गटाची स्थापना केली व त्या माध्यमातून महिलांना स्वबळावर उभे राहण्याची प्रेरणा मिळाली आधारकार्ड,मतदान कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड



इ.तात्काळ उपलब्ध होण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून ते उपलब्ध करून दिले.वसाहतीतील रहिवासी यांचे वाढदिवस अनाथाश्रम ,अंधमूकबधिर शाळा आदी ठिकाणी साजरे करतात ते साजरे करताना कपडे,खाऊ याचे वाटप केले जाते. छोट्या गोष्टीतून माणसं जोडणे,अडीअडचणी सोडवणे हा अनितातार्इंचा स्वभाव आहे.त्यांच्या या कार्याची नोंद घेऊन पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे.एका गृहिणीला,सर्वसामान्य स्त्री चा खऱ्या अर्थाने सन्मान होत असल्याने अनिता ठाकुर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# तळोदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा; दै.वादळ वार्ताच्या वृत्ताची दखल

## बोरद येथे लवकरच सी सी आय चे कापूस हमीभाव खरेदी केंद्र सुरू होणार!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आहे. तळोदा तालुक्यात शासकीय हमीभाव केंद्र नसल्याने शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवण्यासाठी दैनिक वादळवार्ता या वृत्तपत्राने दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी' बोरद परिसरातील शेतकऱ्यांची मागणी पूर्ण करा'. या शीर्षकाखाली प्रकाशित केलेल्या बातमीची शासनाने त्वरित दखल घेतली आहे.यामुळे, तळोदा तालुक्यातील बोरद येथील शाम फायबर्स जिनिंग प्रेसिंग येथे लवकरच भारतीय कपास निगम मार्फत किमान आधारभूत किंमत दराने कापूस खरेदी केंद्र सुरू होणार आहे. अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांचा कापूस


दैनिक वादळ वार्ता

बोरद परिसरातील शेतकऱ्यांची मागणी पूर्ण करा!

शासकीय कापूस खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी; शेतकऱ्यांची वेळ आणि पैशांची बचत होणार

28 Oct 2025 - Page 4 | epaper.vadalvarta.com

खासगी व्यापारी कमी भावाने आणि वजनात घोळ करून खरेदी करत होते. दै. वादळवार्ता ने शेतकऱ्यांची बाजू मांडून बोरद येथे केंद्र सुरू करण्याची मागणी सतत लावून धरली होती. त्या मागणीला यश आले असून, कृषी उत्पन्न बाजार समिती, तळोदा मार्फत तालुक्यातील शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी त्वरित आपला कापूस विकण्यासाठी 'कपास किसान' या पद्वारे ऑनलाईन नोंदणी करावी.शेतकऱ्यांनी आपला शेतीमाल बाजार समितीमध्येच विक्री केल्यास त्यांना बाजार समितीची रितसर 'चुकवती' आणि 'तकपट्टी' मिळते.

> याशिवाय, शेतकऱ्यांसाठी आणखी एक दिलासा देणारी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित मार्फत तळोदा उपप्रादेशिक कार्यालयाच्या अंतर्गत प्रतापपूर व शिर्वे येथे ज्वारी आणि मका या भरडधान्यांसाठी आधारभूत किंमत खरेदी केंद्र देखील सुरू झाले आहेत.

यामुळे भविष्यात भावांतर योजनेत भाव फरक किंवा शासनाकडून कोणतेही अनुदान मिळाल्यास ते मिळवणे सोपे होते, असे आवाहन तळोदा कृषी उत्पन्न बाजार समितीने केले आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आपला शेतमाल योग्य दरात विकावा आणि खासगी व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक टाळावी.

# अल्पवयीन बालिकेच्या विनयभंग प्रकरणी केळी विक्रेता गजाआड; पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

## पालकांच्या सतर्कतेमुळे टळला मोठा अनर्थ

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार शहरात एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. जुनी सिंधी कॉलनी परिसरात एका केळी विक्रेत्याने ८ वर्षीय अल्पवयीन बालिकेचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. बालिकेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, या नराधम विक्रेत्याविरुद्ध उपनगर पोलीस ठाण्यात बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीत बालिका जुनी सिंधी कॉलनी येथील रहिवासी आहे. शनिवार (दि. ८) आणि रविवार (दि. ९) रोजी सकाळी ११.३० वाजेदरम्यान ही घटना घडली. बालिका घराच्या अंगणात खेळत असताना आरोपी केळी विक्रेता (वय-४७) हातगाडी घेऊन तिथे आला. त्याने बालिकेला केळी देण्याच्या बहाण्याने आपल्याजवळ बोलावले आणि तिच्या हातात केळी दिली. त्यानंतर त्याने बळजबरीने बालिकेच्या डोक्यावर व शरीरावर हात फिरवून तिच्याशी असभ्यवर्तन केले.

फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, दुसऱ्या दिवशीही या आरोपीने त्याच वाईट उद्देशाने बालिकेला पुन्हा जवळ बोलावण्याचा प्रयत्न केला. पालकांना हा प्रकार लक्षात आल्यामुळे मोठा अतिप्रसंग टळला. बालिकेच्या वडिलांनी तात्काळ उपनगर पोलीस ठाणे गाठून आरोपी केळी विक्रेत्याविरुद्ध तक्रार दाखल केली. केळी विक्रेता (रा. बागवान मोहल्ला, नंदुरबार) याच्याविरुद्ध उपनगर पोलीस ठाण्यात बालकांचे लैंगिक छळवणूक करून विनयभंग केल्याच्या आरोपाखाली पोस्को कायद्यानुसार २०१२ चे कलम ८, १२ आणि अन्य कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. उपनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजोग बच्छाव हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत सी.व्ही.रमण व मेरी क्युरी जयंती साजरी



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी सी.व्ही.रमण व मादाम मेरी क्युरी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.चंद्रशेखर वेंकट रमण यांचा जन्म तामिळनाडू राज्यातील तिरुचिरापल्ली येथे झाला ते भारतीय भौतिक शास्त्रज्ञ होते.१९३० मध्ये प्रकाश विखुरण्यासाठी त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळा केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम यांनी सांगितले.भारत सरकार तर्फे दरवर्षी राष्ट्रीयविज्ञान दिन म्हणून हा दिवस ओळखला जातो.रमण हे१९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये पहिले भारतीय संचालक बनले. मादाम मेरी क्युरी या पोलिश वंशाच्या फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ आणि रसायनशास्त्रज्ञ होत्या. त्यांचा जन्म दि.७ नोव्हेंबर १८६७ रोजी झाला.त्या रेडिओ अक्टिव्हिटीवरील (किरणोत्सर्गी)कामासाठी प्रसिद्ध आहेत.त्यांनी दोनदा नोबेल पारितोषिक जिंकले आणि फ्रान्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स पदवी मिळविणारीपहिली महिला होत्या.त्यांनी किरणोत्सर्गी संस्थानिकांचे पृथक्करण करण्यासाठी तंत्रांचा शोध लावला.भौतिक शास्त्रातील नोबेल पारितोषिक पती पियरे क्युरी आणि हेन्री बेकरेल यांच्यासोबत मिळाले. नोबेल पारितोषिक मिळविणारी पहिली महिला.दोन वेगवेगळ्या विज्ञान शाखांमध्ये नोबेल पारितोषिक मिळविणारी पहिली महिला.स्वता:, पती व मुलगा यांना पारितोषिक मिळाले अशी माहिती श्री.राजाभाऊ कदम यांनी दिली.या शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.मुळे रामकिशन व संदीपठोंबरे, शिक्षक श्री.आकाश लोंढे, श्री.राहुल बचुटे, श्री.आबासाहेब धपाटे, शिक्षिका श्रीमती भोरे निलावती मॅडम,श्रीमती उटीकर अंजली, ट्रेनी शिक्षिका काळे रोहिणी, शापोआ.कामगार सुवर्णमाला पवार यांनी सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.राहुल बचुटे यांनी केले व आभार संदीप ठोंबरे सर यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077